# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः14.08.2025** **वारःगुरुवार**

---

1. नव्या आकांक्षा, नवी स्वप्नं आणि नव्या आशा यांचा जागर करत 79 वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी देशभर उत्साह, दिल्लीसह सर्व ठिकाणी कडक सुरक्षा व्यवस्था
2. राष्ट्रपती दौपदी मुर्मू आज संध्याकाळी देशाला संबोधित करणार
3. राष्ट्रीय स्तरावरील उत्सवात सहभागी होण्यासाठी देशभरातील 210 सरपंचांना आमंत्रण
4. भारतातील सौर उर्जा उत्पादन आणि स्वच्छ ऊर्जा निर्मितीत महत्वाचा टप्पा पार आणि
5. आंध्रप्रदेशमध्ये मुसळधार पावसानं जनजीवन विस्कळीत, उत्तरेकडील राज्यांत मुसळधार पावसाची शक्यता

**स्वातंत्र्यदिन**

भारत देश 79 वा स्वातंत्र्यदिन साजरा करण्यासाठी सज्ज होत आहे. नागरिकांच्या उत्साहाला उधाण आलं असून नव्या आकांक्षा, नवी स्वप्नं आणि नव्या आशा यांचा जागर उद्या साजऱ्या होणाऱ्या या राष्ट्रीय सणाच्या निमित्तानं केला जात आहे. दिल्लीसह देशभरात कडक सुरक्षा व्यवस्था तैनात करण्यात आली आहे. लाल किल्ल्यावर होणाऱ्या कार्यक्रमात सन्माननीय अतिथी म्हणून या वर्षी 210 सरपंचांना आमंत्रित करण्यात आलं आहे. यामध्ये महिला सरपंचांचा लक्षणीय सहभाग आहे. या सरपंचांनी आपल्या गावांमध्ये पायाभूत सुविधांचा विकास व्हावा यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत तसंच केंद्र सरकारच्या योजना शंभर टक्के कार्यान्वित करताना स्थानिक गरजांनुसार नवीन उपक्रमही राबवले आहेत. यामध्ये महाराष्ट्रातल्या 15 सरपंचांचा समावेश असून यात नऊ महिला सरपंच आहेत. या सर्व सरपंचांचा आज दिल्लीत पंचायत राज मंत्रालयाकडून सन्मान करण्यात येणार आहे. या वर्षीच्या या कार्यक्रमाचं घोषवाक्य 'आत्मनिर्भर पंचायत, विकसित भारताची ओळख' अशी असून या वेळी सभासार ॲपचं उद्घाटन करण्यात येणार आहे.

**राष्ट्रपती संबोधित**

स्वातंत्र्यदिनाच्या पूर्वसंध्येला प्रथेनुसार राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू राष्ट्राला संबोधित करणार आहेत. याचं थेट प्रसारण आज संध्याकाळी 7 वाजता आकाशवाणीच्या आणि दूरदर्शनच्या सर्व केंद्रांवरून केलं जाणार आहे. या संबोधनाचा मराठीतून अनुवाद रात्री साडेनऊ वाजता प्रसारित केला जाईल.

**राष्ट्रपती**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज सकाळी राष्ट्रपती भवनात अमृत उद्यानाच्या वार्षिक महोत्सवाचे उद्घाटन करतील. येत्या शनिवारपासून सकाळी 10 ते संध्याकाळी 6 वाजेपर्यंत जनतेसाठी खुले असेल. या उद्यानाचा पर्यटक 14 सप्टेंबरपर्यंत आनंद घेऊ शकतात. 29 ऑगस्ट रोजी राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त खेळाडूंना अमृत उद्यानात विशेष प्रवेश असेल आणि 5 सप्टेंबर रोजी शिक्षक दिनानिमित्त शिक्षकांना प्रवेश मिळेल.

**पंतप्रधान**

भारतातील सौर उर्जा उत्पादन आणि स्वच्छ ऊर्जा निर्मितीच्या प्रयत्नांमध्ये वाढ झाल्याबद्दल पंतप्रधान मोदी यांनी कौतुक केलं आहे. सूर्यप्रकाशाचे विजेमध्ये रूपांतर करण्याच्या प्रकल्पांमध्ये वाढ झाल्याबद्दल समाजमाध्यमावरील

संदेशात नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा मंत्री प्रल्हाद जोशी यांच्या पोस्टचा हवाला देत पंतप्रधानांनी हा संदेश प्रसारित केला आहे. हा उर्जा क्षेत्रातील स्वावलंबनाच्या दिशेने आणखी एक मैलाचा दगड असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे. भारताने सौरउर्जा प्रकल्प आणि उत्पादकांच्या मान्यताप्राप्त यादीत अर्थात एएलएमएममध्ये 100 गिगावॅट सौर पीव्ही मॉड्यूल उत्पादन क्षमतेचा एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे, ही क्षमता 2014 मध्ये केवळ 2 पुर्णांक 3 गिगावॅट इतकी होती. सौरुर्जेच्या बाबतीत भारत मजबूत, स्वावलंबी सौर उत्पादन परिसंस्था तयार करत असल्याचं जोशी यांनी सांगितलं. ही कामगिरी भारताच्या आत्मनिर्भर भारताच्या दिशेने आणि 2030 पर्यंत 500 गिगावॅट जीवाश्म इंधन विरहित उर्जा निर्मिती क्षमतेचं उद्दिष्ट साध्य करण्याच्या दिशेने एक पूल आहे. या कामगिरीचे श्रेय पंतप्रधान मोदींच्या दूरदर्शी नेतृत्वाला आणि उच्च-कार्यक्षमता सौर मॉड्यूलसाठी उत्पादन आधारित प्रोत्साहन लाभ योजनेसारख्या परिवर्तनकारी उपक्रमांना जातं असंही त्यांनी आपल्या संदेशात नमूद केलं आहे.

**<u>जयशंकर</u>**

आत्मनिर्भरता ही मानसिकता असून जागतिक आव्हानांचा सामना करण्यासाठी आत्मनिर्भर असणं आवश्यक असल्याचं प्रतिपादन परराष्ट्र व्यवहारमंत्री डॉ एस जयशंकर यांनी काल नवी दिल्ली इथं केलं. पर्यटनाला चालना देण्यासाठी आयोजित टुरिझम फेथ परिषदेला संबोधित करताना ते बोलत होते. देशाची विविधता मजबूत पर्यटन हे खूप महत्वाचे आहे. ई-व्हिसाच्या पद्धतीमुळे पर्यटकांना भारताला भेट देणं अधिक आनंददायी बनलं आहे. गेल्या दशकात विमानतळांची संख्या दुप्पट झाली आहे आणि रेल्वेमध्ये मोठा बदल झाला आहे. असे गौरवोद्गारही त्यांनी यावेळी काढले.

**<u>आयात-शुल्क</u>**

अमेरिकेनं लादलेल्या आयात शुल्काचा भारतीय निर्यातीवर होणारा परिणाम अल्पकाळ असेल आणि तो एक किंवा दोन तिमाहीत कमी होईल असं मुख्य आर्थिक सल्लागार व्ही अनंत नागेश्वरन यांनी काल मुंबईत सांगितलं. रत्न आणि दागिने तसंच मासेमारी क्षेत्रातील कोळंबी व्यापार आणि कापड यासारख्या क्षेत्रांना सुरुवातीचा फटका बसत आहे, परंतु अर्थव्यवस्थेवर दीर्घकालीन परिणाम मर्यादित असेल. व्यावसायिकांनी धीर धरावा असं आवाहन त्यांनी केलं. सरकारला परिस्थितीची जाणीव आहे आणि प्रभावित क्षेत्रांशी आधीच चर्चा सुरू केली आहे यावर नागेश्वरन यांनी भर दिला.

**<u>ट्रंप</u>**

रशिया-युक्रेन संघर्षाच्या पार्श्वभूमीवर, रशियाचे राष्ट्रपती व्लादिमीर पुतीन यांच्याशी चर्चा करताना एकतर्फी करार करु नये असं आवाहन युरोपीय नेत्यांनी काल अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांना केलं. उद्या अलास्कामध्ये दोनही नेत्यांदरम्यान बैठक होणार आहे. या अनुषंगाने जर्मन चान्सलर फ्रेडरिक मर्झ यांनी डोनाल्ड ट्रम्प, युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की आणि अनेक युरोपीय नेत्यांसह दुरस्थ माध्यमातून शिखर बैठकीत हे आवाहन करण्यात आलं. पुतिन आपल्या अटी आणि नियम लादून युद्ध पुन्हा सुरू करण्याचा प्रयत्न करतील अशी भीती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर ही बैठक घेण्यात आली. ट्रम्प यांनी ही दुरस्थ चर्चा चांगली झाल्याचं म्हटलं आहे. पुतिन यांच्याशी त्यांची शिखर परिषद चांगली झाली तर रशियन अध्यक्ष आणि झेलेन्स्की यांच्यात लगेचच पुढील बैठक होऊ शकते. अशी आशा त्यांनी पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली.

**<u>उत्तराखंड</u>**

उत्तराखंड मंत्रिमंडळाने माजी अग्निवीरांना सैन्यातून परतल्यानंतर सरकारी सेवांमध्ये थेट भरतीसाठी 10 टक्के आरक्षणाला मान्यता दिली आहे. मुख्यमंत्री पुष्कर सिंह धामी यांच्या अध्यक्षतेखाली काल झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. हे आरक्षण राज्य सरकारच्या अंतर्गत सेवांमध्ये गट 'क' च्या पदांसाठी आहे. दरम्यान, बेकायदेशीर

धर्मांतरांला आळा घालण्यासाठी कठोर तरतुदी असलेल्या उत्तराखंड धर्म स्वातंत्र्य सुधारणा विधेयक, 2025 लाही मंत्रिमंडळाने मान्यता दिली.

**भटकी-कुत्रे**

दिल्ली-एनसीआरमध्ये भटक्या कुत्र्यांच्या धोक्याबाबत सर्वोच्च न्यायालय अलिकडच्या आदेशाची पुनर्तपासणी करणार आहे. सरन्यायाधीशांनी यासाठी न्यायमूर्ती विक्रम नाथ, संदीप मेहता आणि एन.व्ही. अंजारिया यांचा समावेश असलेलं 3 न्यायाधीशांचं खंडपीठ स्थापन केलं आहे. या प्रकरणाची सुनावणी आज होणार आहे. तत्पूर्वी, सर्वोच्च न्यायालयाच्या वेगवेगळ्या खंडपीठांनी याविषयासंदर्भात परस्परविरोधी निर्देश दिले आहेत असा उल्लेख एका वकिलांनी केल्यानंतर सरन्यायाधीश न्यायमूर्ती भूषण गवई यांनी कुत्र्यांशी संबंधित वर्तमान मुद्द्याची तपासणी आपण करु असं सांगितलं होतं. खंडपीठाने भटक्या कुत्र्यांना आश्रयस्थानांमध्ये स्थलांतरित करणं आणि त्यांना सार्वजनिक ठिकाणी परत सोडण्यास मनाई करणं अनिवार्य केलं होतं. रेबीजमुळे होणाऱ्या भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यांच्या वाढत्या धोक्याबद्दल माध्यमातील बातम्यांच्या आधारे सर्वोच्च न्यायालयानं स्वतःहून दखल घेत हा आदेश दिला होता.

**हवामान**

उत्तर आंध्र प्रदेश आणि दक्षिण ओडिशाच्या किनाऱ्याजवळ पश्चिम-मध्य आणि लगतच्या वायव्य बंगालच्या उपसागरावर कमी दाबाचा पट्टा तयार झाल्यामुळे काल आंध्र प्रदेशातील अनेक भागात मुसळधार पाऊस पडला यामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ झाल्यानं पुरास्थिती निर्माण झाली आहे. यामुळे सामान्य जनजीवन विस्कळीत झालं आहे. गेल्या 24 तासांत विजयवाडा इथं पावसाशी संबंधित घटनांमध्ये दोन जणांचा मृत्यू झाला, तर विजयनगरम, गुंटूर, कृष्णा आणि इतर किनारी जिल्ह्यांमध्ये मुसळधार पाऊस पडला. गोदावरी जिल्ह्यांसाठी अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

मुख्यमंत्री एन. चंद्राबाबू नायडू यांनी काल राज्यातील मंत्री आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांसोबत उच्चस्तरीय बैठक घेतली आणि पुर तसंच पावसामुळे उद्भवलेल्या परिस्थितीचा आढावा घेतला. तेलंगणामध्ये, हैदराबादसह राज्याच्या काही भागात काल झालेल्या मुसळधार पावसामुळे राजीव गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर विमान वाहतूक विस्कळीत झाली. आठ उड्डाणे रद्द करण्यात आली, तर वाईट हवामानामुळे उतरू न शकलेली 11 उड्डाणे इतरत्र वळवण्यात आली.

पुढील चोवीस तासांत जम्मू आणि काश्मीर, हिमाचल प्रदेश, पूर्व मध्य प्रदेश, विदर्भ आणि किनारी आंध्र प्रदेशात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. पुढील पाच दिवसांत उत्तराखंडमध्ये मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि उत्तर प्रदेशातील काही ठिकाणी शनिवारपर्यंत अशीच परिस्थिती राहण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

## याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

## नमस्कार.